संदर्भ क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२६-२२४२,
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५.
दूर.०२२-३५२५२३४६/४७/४८/४९/५०,
E-mail ID : sgb_sanpada@yahoo.co.in

**दिनांक : ५ फेब्रुवारी, २०२६**

# आ दे श

**विषय :- सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना दि.१ जानेवारी,२०२६ पासून लागू करण्यांत आलेला विशेष भत्ता/महागाई भत्ता, घरभाडे भत्ता.**

सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२५-६१९७, दि.५.८.२०२५ च्या आदेशान्वये दि.१ जुलै, २०२५ पासून निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/कि.वे.अ./वि.भ.जाने-जुन/२०२६(१)/कार्या-१०/५४३-५५०/७८-७९, दि.४.०२.२०२६, अन्वये दि.१ जानेवारी, २०२६ ते दि.३० जून, २०२६ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्याचा दर रु.३,९००.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि.०५.०२.२०२५ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि.१ जानेवारी,२०२६ ते दि.३० जून, २०२६ या कालावधीकरीतां रु.३,९००.०० दरमहा निश्चित केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) २०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे. नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०२३-२४६७, दि.१६ मे, २०२३ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

**सुरक्षा रक्षक/महिला सुरक्षा रक्षक यांना दि.१.१.२०२६ ते दि.३०.६.२०२६ पर्यंत लागू करण्यांत आलेले वेतन व भत्ते**

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४५.३५ %) रुपये | लेव्ही रु (घरभाडे, रजाकालीन प्रवास भत्ता @ ३.२५%) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ म.सु.रक्षक | १३,४५७.०० | ३,९००.०० | ३,४७१.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,३२८.०० | ७,८७१.०० | ११६.०० | ३२,३१५.०० |

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४५.३५% दराने व घरभाडे भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ३.२५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

**मुख्य सुरक्षा रक्षक, सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांना दि.१.६.२०२६ ते दि.३०.६.२०२६ पर्यंत लागू करण्यांत आलेले वेतन व भत्ते**

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४३.१०%) रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुख्य सुरक्षा रक्षक | १३,७३२.०० | ३,९००.०० | ३,५२६.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,६५८.०० | ७,५९९.०० | ३२,२५७.०० |
| २ | सुरक्षा पर्यवेक्षक | १४,४३२.०० | ३,९००.०० | ३,६६६.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,४९८.०० | ७,९०१.०० | ३३,३९९.०० |
| ३ | सहा.सु. अधिकारी | १४,६५७.०० | ३,९००.०० | ३,७११.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,७६८.०० | ७,९९८.०० | ३३,७६६.०० |
| ४ | सुरक्षा अधिकारी | १५,१०७.०० | ३,९००.०० | ३,८०१.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २६,३०८.०० | ८,१९२.०० | ३४,५००.०० |
| ५ | मुख्य सुरक्षा अधिकारी | १५,५५७.०० | ३,९००.०० | ३,८९१.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २६,८४८.०० | ८,३८६.०० | ३५,२३४.०० |

*** किमान वेतन = मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता**

...२

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत मुख्य सुरक्षा रक्षक, सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४३.१०% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील.

राज्य कामगार विमा योजनेच्या वेतनाच्या कक्षेबाहेर गेलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीतां मंडळाने कामगार भरपाई अधिनियम, १९२३ ची योजना दि.१.७.२०२३ रोजीपासून लागू केलेली आहे.

सुरक्षा रक्षक मंडळ हे मंडळातील नोंदीत मुख्य मालकाच्या वतीने महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळात नोंदीत झालेले आहे.

नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांकरिता मंडळाने निश्चित केलेले दर **८ तासांकरिता** असून त्यामध्ये साप्ताहीक सुट्टीचा समावेश आहे.

सबब, मंडळातील सर्व नोंदीत मुख्य मालकांना निर्देशित करण्यांत येते की, वितरीत केलेल्या सुरक्षा कर्मचारी यांचे उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार दि.१.१.२०२६ पासून दराने वेतन व लेव्ही पुढील महिन्याच्या ४ तारखेपर्यंत मंडळास अदा करण्यांत यावी.

सही/-
(अशोक ल. डोके)
**कामगार उप आयुक्त** व
**अध्यक्ष**
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :**
**प्रति,**
**मे. ..............................................., नों.क्र. ........., युनिट क्र. .........**
**................................................................**
**................................................................**
**................................................................**

**This being a computerised printed copy, signature is not required.*

***Z/WG REV for Jan 2026**